RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ३०] शुक्रवार, मार्च ३, २०२३/फाल्गुन १२, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ६५

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २ मार्च, २०२३

### अधिसूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम.**

क्रमांक बीपीटी-११२२/प्र.क्र.१८/कार्यासन पंधरा.– महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम (१९५० चा २९) याच्या कलम ४१ अअ च्या पोट-कलम (४) च्या खंड (ब) द्वारे प्रदान केलेले अधिकारांचा वापर करून, आणि शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग, क्रमांक बीपीटी-१११७/प्र.क्र.३४/कार्यासन पंधरा, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ चे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम ४१ अअ च्या पोट-कलम (४) च्या खंड (ब) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे "निर्धन व्यक्ती असण्यासाठी" व्यक्तीच्या एकूण वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रुपये एक लाख ऐंशी हजार इतकी विनिर्दिष्ट करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नंदकिशोर ल. मोरे,
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.

## विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २ मार्च २०२३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम.**

क्रमांक बीपीटी-११२२/प्र.क्र.१८/कार्यासन पंधरा.– महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम (१९५० चा २९) याच्या कलम ४१अअ च्या पोट-कलम (४) च्या खंड (क) द्वारे प्रदान केलेले अधिकारांचा वापर करून, आणि शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग, क्रमांक बीपीटी-१११७/प्र.क्र.३४/कार्यासन पंधरा, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ चे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम ४१अअ च्या पोट-कलम (४) च्या खंड (क) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे "समाजातील दुर्बल घटकांतील व्यक्ती" असण्यासाठी जी निर्धन व्यक्ती नाही अशा व्यक्तीच्या एकूण वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रुपये तीन लाख साठ हजार इतकी विनिर्दिष्ट करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नंदकिशोर ल. मोरे,**
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.